आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. १६३

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१६ यांचा उर्वरीत उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे नाही की नि.९५ वरील स्पेशल ऑडीट रिपोर्टच्या फाइंडींग रिपोर्टमध्ये माझ्या employee ID नमुद आहे.

प्रश्न– ०८५६४७ व १२५०८१ यापैकी तुमचा आयडी कोणता आहे?

उत्तर– दोन्ही आयडी माझे नाहीत.

माझा आयडी १३४४१० आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.२५.२.२०२१ रोजी संदीप बिरादार चौकशीसाठी आले असताना त्यावेळेसचे ब्रँच मॅनेजर सोनाली जाधव रजेवर असताना त्यांचा कार्यभार माझ्याकडे होता. हे म्हणणे खरे आहे की दि.२५.२.२०२१ रोजी सोनाली जाधव रजेवर होत्या. हे मला सांगता येणार नाही की त्यादिवशी बँकेत ऑफीसर म्हणुन फक्त मीच कार्यरत होते. मला स्पेशल ऑडीट रिपोर्ट दाखवण्यात आला. त्यामध्ये माझा आयडी क्र.१३४४१० नमुद आहे.

प्रश्न– रंजना मोरे यांचे साडे तीन लाख रुपयांचे व्यवहार तुमच्या आयडीवरुन झाले हे बरोबर आहे का?

उत्तर– माझ्या आयडीवरुन होवु शकते मात्र ते व्यवहार मीच केले होते असे म्हणता येणार नाही.

प्रश्न– आरोपी तुमचा आयडी वापरु शकतो का?

उत्तर– माझे अपरोक्ष आरोपी माझा आयडी वापरु शकतो.

हे म्हणणे खरे आहे की बँकेचा संगणक चालु करण्यासाठी सुरुवातीला आयडी टाकुन बायोमेट्रीक अंगठा दिला जातो. हे म्हणणे खरे नाही की माझा अंगठा दिल्याशिवाय किंवा माझ्या परवानगीनेच आरोपी संगणक वापरु शकतो. गौतम जाधवने मी वडझीरे शाखेत असताना माझा आयडी चोरुन वापरल्याबद्दल मला जाणीव झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये रंजना मोरेव रामभाऊ मोरे यांच्या व्यवहारांसंदर्भात माझा आयडी नमुद असल्याने मला त्यांच्या व्यवहारांबाबत संपुर्ण कल्पना होती.

प्रश्न– बँक करस्पॉडंटने जर राजीनामा दिला तर त्यानंतर खातेदाराचे साडेतीन

लाख रुपये तो स्वतःच्या खात्यावर घेवु शकतो ही बाब शक्य नाही?

उत्तर– तसे होवु शकते.

प्रश्न– बँक करस्पॉडंटने राजीनामा देवुनही तो खातेदाराचे पैसे स्वतःच्या खात्यावर घेण्यासंदर्भात बँक तशी परवानगी देवु शकते का?

उत्तर– बँक करस्पाँडंट पॉइंट डिलीट केला असेल मात्र बी.सी.चे कस्टमर म्हणुन खातेदार चालु असेल तर तसे होवु शकते.

प्रश्न– बी.सी.ने त्याचा राजीनामा दिल्यानंतर ति–हाइत व्यक्तीच्या व्यवहाराबाबत बी.सी.ला व्यवहार करण्यासंदर्भात बँक परवानगी देवु शकते का?

उत्तर– देवु शकते.

प्रश्न– साडे तीन लाख रुपयांच्या बेअरर चेकवर पुढे सेल्फ लिहीले असेल व चेकच्या पाठीमागे आरोपीची सही असेल तर ती रक्कम आरोपीस देता येईल का?

उत्तर– देता येईल.

हे म्हणणे खरे नाही की साडे तीन लाख रुपयांसारख्या रकमेसाठी खातेदार जर हजर नसेल तर खातेदाराची परवानगी घेणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने त्याचा राजीनामा दिल्यामुळे आरोपीच्या राजीनाम्याचा गैरवापर केला. हे मला सांगता येणार नाही की ज्या खातेदारांचे पैसे बुडाले होते त्यांनी दिलेल्या तक्रारी अर्जांमध्ये आरोपीसोबत कॅशीयर बोरुडे, माझे व भुषण संखे यांचे नाव असल्याचे नमुद होते. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी तक्रारी अर्ज आले त्यावेळी मी ॲग्रीकल्चरल ऑफीसर होते.

प्रश्न– तुमचा employee आयडी आरोपी चोरुन वापरत होता असे होवु शकते का?

उत्तर– होवु शकते.

प्रश्न– तुमच्या पोलीसांसमोरील जबाबात नमुद मजकुर की 'तसेच फीक्स्ड डिपॉझीटच्या को–या पावत्या या बँकेच्या कस्टडीतुन व माझ्या सहीने बाहेर काढत व ठेवत असत' हा मजकुर बरोबर आहे का?

उत्तर– हा मजकुर खोटा आहे.

प्रश्न– तुमच्या पोलीसांसमोरील जबाबात वरील मजकुर का आला?

उत्तर– मी ॲग्रीकल्चरल ऑफीसर असुन वॉल्ट टेलरचा चार्ज माझ्याकडे नाही

त्यामुळे माझ्या सहीने बँकेच्या कस्टडीतुन पावत्या बाहेर काढण्याचा व ठेवण्याचा प्रश्नच नाही.

प्रश्न– तुम्ही सेंट्रल बँकेत कार्यरत असताना वॉल्ट टेलर कोण होते?

उत्तर– ब्रँच मॅनेजर होते. सोनाली जाधव व भुषण संखे यांच्याकडे वॉल्ट टेलरचा कार्यभार होता.

प्रश्न– सोनाली जाधव व भुषण संखे हे वॉल्ट टेलर व बी.एम. असल्यामुळे त्यांच्या सहीनेच एफडीच्या पावत्या बँकेच्या कस्टडीतुन बाहेर काढल्या जात होत्या व तुमच्या सहीने त्या बाहेर काढल्या जात असल्याचा प्रश्न नाही?

उत्तर– ज्यादिवशी ब्रँच मॅनेजर व वॉल्ट टेलर गैरहजर असतील त्यादिवशी एखाद्या कस्टमरची जर एफडी काढायची असेल तर ज्याच्याकडे ब्रँच मॅनेजर व वॉल्ट टेलरचा चार्ज असेल तर त्याच्या सहीने ती एफडी बाहेर काढली जात होती.

प्रश्न– ज्यादिवशी ब्रँच मॅनेजर रजेवर असायचे त्यादिवशी तुमच्याकडे असीस्टंट ब्रँच मॅनेजरचा चार्ज असल्यामुळे गौतम जाधव तुमच्या सहीने एफडीच्या पावत्या बाहेर काढायचा ?

उत्तर– हे खोटे आहे.

प्रश्न– ब्रँच मॅनेजर रजेवर असताना तुमच्या सहीने एफडीच्या पावत्या काढल्या जायच्या का?

उत्तर– गरज पडली तर पावत्या काढल्या जायच्या.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या पोलीसांसमोरील जबाबात आरोपी माझ्या सहीने फीक्स्ड डिपॉझीटच्या पावत्या बँकेतुन काढत होता हे खोटे असल्याने पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगितल्याप्रमाणे घेतलेला नाही. आता मला माझ्या पोलीसांसमोरील जबाबातील अधोरेखांकीत भाग अ दाखवण्यात आला.

प्रश्न– तुमच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग अ हा चुकीचा असुन इतर सगळा मजकुर बरोबर आहे असे म्हटले तर बरोबर होईल का?

उत्तर– होय, बरोबर आहे.

हे म्हणणे खरे आहे की मी जशी घटना पोलीसांना सांगितली पोलीसांनी तशीच्या तशी ती नोंदवली नाही. वडझीरे शाखेतुन माझा कार्यकाळ पुर्ण झाल्यानंतर बदली झाली. हे म्हणणे खरे नाही की अपहारानंतर माझी तडकाफडकी बदली झाली

होती. वडझीरे शाखेत अपहार झाल्यानंतर व फिर्याद दाखल झाल्यानंतर माझे इंक्रीमेंट कमी झाले असे काही झाले नाही. हे मला सांगता येणार नाही की दि.२३.१०.२०२० रोजी आरोपीने बी.सी. पदाचा राजीनामा दिल्यानंतर आरोपी त्याच्या वैयक्तीक कामाशिवाय इतर कुठल्याही कामासाठी बँकेत आला नाही. आरोपी काम करत असताना त्याला बँकेत सेपरेट टेबल दिला नव्हता. आरोपीला सी.बी.एस. सॉफटवेअरचे ट्रेनींग दिले होते का हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की बँक स्टाफ बी.सी.ला स्वतःचा आयडी देवु शकत नाही. मी आरोपीस स्वतःहुन माझा आयडी दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की माझ्या स्वतःच्या आयडीवरुन झालेल्या व्यवहारांची जबाबदारी माझीच असते.

प्रश्न– रंजना दत्तात्रय मोरे व दत्तात्रय मोरे यांचे व्यवहार तुमच्या आयडीवरुन झाले असल्यामुळे त्या व्यवहारांची जबाबदारी तुमची होती

उत्तर– हे मला सांगता येणार नाही.

हे मला सांगता येणार नाही की स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये ज्या ज्या ठिकाणी व्यवहारांबाबत माझा आयडी नमुद आहे त्याची जबाबदारी माझीच होती. मी सांगते की ते आमचे हेड ऑफीस ठरवणार.

प्रश्न– अपहार हा वडझीरे शाखेत झाला की बी.सी. सेंटर, पाडळीदर्या येथे झाला?

उत्तर– तो अपहार कुठेही होवु शकतो.

हे म्हणणे खरे नाही की वडझीरे शाखेत ज्या आयडींवरुन व्यवहारांसंदर्भात अपहार झाले त्यास ज्या कर्मचा–यांचे ते आयडी होते ते कर्मचारी जबाबदार आहेत. एक लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम विथड्रॉ करायची असेल तर कॅश जर हवी असेल तर त्यासाठी कस्टमर पाहीजे व त्याची सही चेक केली पाहीजे आणि ट्रान्स्फर असेल तर त्यासाठी कस्टमरची गरज नाही. हे म्हणणे खरे आहे की ग्राहक स्वतः उपस्थित असेल तर त्याने केलेली सही व बँकेत रेकॉर्डमध्ये असलेली सही आम्ही तपासुन पाहतो.

प्रश्न– एक लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम ट्रान्स्फर करण्यासाठी जर ग्राहकाच्या हजरेची गरज नसेल तर काय करणे गरजेचे आहे?

उत्तर– विथड्रॉवल स्लीपच्या पाठीमागे ग्राहकाला कोणाच्या खात्यावरुन कोणाच्या खात्यावर रक्कम ट्रान्स्फर करायची आहे हे नमुद करणे आवश्यक आहे.

प्रश्न– विथड्रॉवल स्लीपवर जर एक लाख रुपयांपेक्षा जासत रक्कम लिहीली असेल व त्यामागे खातेदाराने आरोपीचे खात्यावर रक्कम ट्रान्स्फर करण्यासंदर्भात लिहीले असेल तर ती रक्कम आरोपीस दिली जावु शकते का?

उत्तर– ती रक्कम अकाउंटवर ट्रान्स्फर होणार.

प्रश्न– खातेदार जर अंध, अपंग किंवा ज्येष्ठ नागरीक असेल तर विथड्रॉवल स्लीपवर लिहुन ति–हाइत व्यक्तीस ते पैसे विथड्रॉ करुन देता येवु शकतात का?

उत्तर– त्यासाठी अगोदर बँक खातेदार अंध, अपंग किंवा ज्येष्ठ नागरिक आहे का याची पडताळणी करते व त्या खातेदाराची परवानगी घेते.

खातेदाराची परवानगी जर बँक स्टाफ अव्हेलेबल असेल तर प्रत्यक्ष जावुन घेतली जाते.

प्रश्न– ज्या खातेदारांच्या विथड्रॉवल स्लीपमध्ये आरोपीने सही करुन त्याचे नाव टाकले त्या सर्व खातेदारांच्या अकाउंटमधील पैसे बँकेने त्या खातेदारांना विचारुनच ट्रान्स्फर केले?

उत्तर– ट्रान्स्फर करण्यासाठी खातेदारांना विचारण्याची गरज नाही.

प्रश्न– ज्या खातेदारांच्या विथड्रॉवल स्लीपमध्ये आरोपीने सही करुन त्याचे नाव टाकले त्या सर्व खातेदारांच्या अकाउंटमधील पैसे बँकेने त्या खातेदारांना विचारुनच आरोपीस विथड्रॉवलद्वारे दिले असेल?

उत्तर– सिग्नेचरसाठी ती सिग्नेचर मॅच होती का ते पाहीले जाते व तसेच कॅश स्वरुपात विथड्रॉवल साठी कस्टमर स्वतः बँकेत हजर पाहीजे.

हे मला सांगता येणार नाही की गोरक्ष खोसे यास दीड लाख रुपये बँकेतुन कॅश स्वरुपात मिळाली व त्यासाठी तो स्वतः बँकेत हजर होता.

प्रश्न– तीन लाख रुपयांच्या खातेदाराच्या चेकवर पुढे जर सेल्फ लिहीले असेल व पाठीमागे जर आरोपीची ओळख म्हणुन सही असेल तर ते पैसे आरोपीस देता येवु शकतात का?

उत्तर– बेअरर चेक असेल तर देता येवु शकते.

घटनेच्या वेळी त्यासंदर्भात खातेदाराला विचारण्याची गरज नव्हती. ज्ञानदेव निघुट यांचा अडीच लाख रुपयांचा चेक माझ्या आयडीवरुन पास केल्याबाबत मला सांगता येणार नाही. आता मला माझ्या पोलीसांसमोरील जबाबातील अधोरेखांकीत

भाग ब दाखविण्यात आला.

प्रश्न– तुमच्या पोलीसांसमोरील जबाबातील अधोरेखांकीत भाग बरोबर आहे का?

उत्तर– बरोबर आहे.

प्रश्न– बँकेचे संगणक आरोपीने वापरण्यासंदर्भात रिजनल मॅनेजरची परवानगी घेतली होती का?

उत्तर– हे मला सांगता येणार नाही.

आरोपीला बँकेचे संगणक वापरु द्या अशी बँकेच्या वरिष्ठांची लेखी तक्रार होती की तोंडी हे सांगता येणार नाही. आरोपीस बँकेच्या वरिष्ठांनी तो बँकेत बिनदिक्कतपणे काम करु शकतो असे सांगितल्याचे मला सांगता येणार नाही. आरोपी कॅशीयर केबीनमध्ये जायचा नाही. बँकेच्या काउंटरच्या आत आरोपी यायचा. हे मी सांगु शकत नाही की दि.२३.१२.२०१९ ते २३.१०.२०२० या कालावधीत आरोपी बँकेत रोज यायचा. तो त्या कालावधीत बँकेत येत होता. हे म्हणणे खरे आहे की आरोपीस बी.सी. म्हणुन जे काम बँकेने दिले होते ते तो व्यवस्थितपणे पार पाडायचा. हे म्हणणे खरे आहे की डिसेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२० या कालावधीमध्ये मला आरोपीच्या कामाबाबत काही हरकत जाणवली नाही तसेच या कालावधीमध्ये ग्राहकांकडुन आरोपीविरुध्द काही तक्रार प्राप्त झाली नाही. संदीप बिरादार चौकशीसाठी आले असताना त्यांना आरोपी बँकेचे संगणक वापरल्याबाबत मी सांगितले नव्हते. वार्षिक ऑडीट करण्यासाठी आलेल्या अधिकारी यांना आरोपीने बँकेचे संगणक वापरल्याबद्दल मी सांगितले नाही. मी कार्यरत असताना बँकेत सरप्राइज व्हीजीट झाली होती का हे मला सांगता येणार नाही. संदीप बिरादार चौकशीसाठी आले असताना एफडीच्या को–या पावत्या मिसींग असल्याबाबत मी त्यांना सांगितले नाही. बी.सी.ला त्यांच्या स्वतःच्या कंपनीने दिलेला आयडी बँकेच्या संगणकामध्ये चालत असेल का याबाबत मला सांगता येणार नाही.

प्रश्न– डिसेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२० मधील कालावधीत एफडीच्या पावत्या मिसींग होत्या का?

उत्तर– एफडीच्या पावत्या मिसींग होत्या मात्र त्या त्याच कालावधीत मिसींग होत्या का हे मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे आहे की डिसेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२० मधील

कालावधीत एफडीच्या पावत्या  मिसींग झाल्या किंवा नाही झाल्या असे होवु शकते. मी ॲग्रीकल्चरल ऑफीसर असताना कर्ज वाटपकामी पाहणी दौ–यासाठी चार पाच वेळा आरोपीची मदत घेतली असेल. फिल्ड वर्कबाबत आरोपीस मी वैयक्तीक वेगळे मानधन दिल्याचे आठवत नाही. निघुट यांचा चेक पास करताना ते स्वतः बँकेत हजर होते का हे मला सांगता येणार नाही. एक लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेचा चेक विथड्रॉ करायचा असेल व ग्राहक हजर नसेल तर त्या चेकच्या व्यवहारावर अवलंबुन असते की ग्राहकाची परवानगी घ्यायची की नाही. हे मला सांगता येणार नाही की ज्ञानदेव निघुट यांचा व्यवहार आरोपीने राजीनामा दिल्यानंतर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की बाहेर काढलेल्या एफडीच्या पावत्यांची व बँकेच्या कस्टडीत असलेल्या एफडी पावत्यांची नोंद बँकेच्या एफडीआर रिसीव्हंस रजिस्टरमध्ये असते. सन २०१९–२० साली एफडीच्या पावत्या मिसींग असल्याबाबत मी पोलीस स्टेशनला कळवले नव्हते. आता मला नि.४७ वरील रंजना मोरे यांच्या एफडीची पावती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही नाही. सदर पावती पाहता ती पावती खरी वाटते. त्या पावतीवरील हस्ताक्षर माझे नाही.

प्रश्न–   त्या  पावतीवरील हस्ताक्षर आरोपीचे आहे का?

उत्तर– आरोपीचे हस्ताक्षर मी ओळखते. नि.४७ वरील पावतीवरील हस्ताक्षर आरोपीचे आहे.

मी किंवा भुषण संखे किंवा सोनाली जाधव यांनी आरोपीस अतिरीक्त काम म्हणुन नि.४७ वरील पावती लिहायला लावल्याचे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दि.२३.३.२०२० रोजीची नि.४७ वरील साडे तीन लाख रुपयांची रंजना मोरे यांची एफडीची पावती मी स्वतः सिस्टममधुन तयार करुन त्याची प्रिंट काढुन ती आरोपीस त्याच्या हस्ताक्षरामध्ये लिहायला लावली. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी रंजना मोरे तिची एफडीची पावती करायला आलीत्यावेळी बँकेत ब्रँच मॅनेजर व ॲग्रीकल्चर ऑफीसर असे दोनच अधिकारी दर्जाचे अधिकारी होते. हे म्हणणे खरे नाही की तसे अधिकारी दर्जाचे दोनच अधिकारी बँकेत असल्याने नि.४७ वरील पावतीवरील दोन सहयांपैकी एक सही ब्रँच मॅनेजर व एक सही माझी आहे. एफडीची पावती बंद करायची असेल तर त्यासाठी बँकेत ग्राहकाच्या हजेरीची आवश्यकता नाही कारण त्या पावतीच्या मागे तिकीटवर सही असते व त्यामुळे

एफडीचे पैसे ग्राहकाच्या अकाउंटवर जमा होतात. हे म्हणणे खरे नाही की रंजना मोरे यांच्या नि.४७ वरील एफडीच्या पावतीमागील रंजना मोरे यांची सही मी व्हेरीफाय केली व त्यानंतर एफडी विथड्रॉ केली. मी सांगते की रंजना मोरे यांची एफडी विथड्रॉ केली नाही.

प्रश्न– रुपाली जाधव यांची एफडी बंद झालेली पावती तुमच्या बँकमध्ये आताही असेल का?

उत्तर– असुही शकते, याबाबत मला सांगता येणार नाही.

एफडीच्या पावत्या एफडी बंद झाल्यावर बँकेच्या रेकॉर्डमध्ये ठेवल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की रुपाली जाधव यांच्या एफडीच्या पावतीवर माझे स्वतःचे हस्ताक्षर असल्याने ती जाणीवपुर्वक बँकेने पोलीसांना सदर केसकामी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की ज्या एफडीच्या पावत्या आम्ही आरोपीकडुन लिहुन घेतल्या केवळ त्याच पावत्या आम्ही जाणीवपुर्वक या केसमध्ये दाखल केल्या. विना व्हाउचर किंवा विना चेक बँक कर्मचारी हा स्वतःच्या आयडीवरुनच पैसे ट्रान्स्फर करु शकतो का याबाबत मला सांगता येणार नाही.

मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.10.14 12:27:03 +0530

(डॉ. एन.एस.सबनीस)

दिनांकः १३/१०/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.

**<u>मध्यान्हानंतर उर्वरीत उलटतपास शपथेवर पुन्हा सुरुः</u>**

हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या आयडीचा मी इनऑपरेटीव्ह अकाउंट ऑपरेटीव्ह करण्यासाठी वापर करत होते. सरप्राइज व्हीजीटमध्ये किंवा ऑडीटमध्ये एफडीच्या को–या पावत्या मिसींग असल्याबाबत आढळले का हे मला सांगता येणार नाही. बँकेचे शिक्के गहाळ झाले किंवा चोरी झाले असे निदर्शनास आल्याबाबत मला आठवत नाही. एफडी करण्यासाठी ग्राहकाकडुन बँक कोणते कागदपत्र घेते हे मला सांगता येणार नाही. आता मला रंजना मोरे यांच्या जबाबासोबत दाखल एफडीची पावतीची झेरॉक्स दाखवण्यात आली. (सरकारी वकीलांनी आक्षेप घेतला की ती

पावती झेरॉक्स प्रत असुन तिचा फेरीस्तमध्ये उल्लेख नाही. त्यामुळे तिला रेफर करता येणार नाही).

हे मला सांगता येणार नाही की ती पावती आमच्या बँकेची आहे. सदर झेरॉक्स पावतीस **ओळखीसाठी नि.१८९** देण्यात येते. त्या पावतीवर आरोपीचे अक्षर आहे का हे सांगता येणार नाही. त्या पावतीवर माझी सही आहे का हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– नि.१८९ वरील दि.१३.३.२०२० रोजीची साडे तीन लाख रुपयांची रंजना मोरे यांच्या एफडीच्या पावतीच्या झेरॉक्सवर तुमची सही असुन त्यावरील हस्ताक्षर आरोपीचे आहे?

उत्तर– हे मला माहीत नाही.

हे म्हणणे खरे नाही की रंजना मोरे यांचे साडे तीन लाख रुपये मी व भुषण संखे यांनी परस्पर हडप करुन केवळ आरोपीचे हस्ताक्षर असल्याने त्याची मुळ पावती या केसमध्ये दाखल नाही.

प्रश्न– नि.१८९ वरील पावती तुमच्या बँकेची असेल तर ती बँकेच्या रेकॉर्डमध्ये असेल?

उत्तर– हे मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की मला बँक कामकाजाची माहीती नाही. मी सांगते की माझ्या पदाची मला माहीती आहे.

प्रश्न– बँकेला पत्र देवुन तुम्ही नि.१८९ वरील पावतीच्या झेरॉक्सची मुळ पावती मागवुन कोर्टात दाखल करायला तयार आहात का?

उत्तर– ती पावती माझ्याकडे नाही. ती कोर्ट मागवु शकते.

हे म्हणणे खरे नाही की रंजना मोरे यांचे साडे तीन लाख रुपये रंजना मोरे बँकेत उपस्थित नसताना व त्यांच्याशी कुठलाही संपर्क न करता मी परस्पर हडप केले आहे. आरोपीस दररोज येवुन बी.सी. म्हणुन त्याच्या कामाचा तपशिल देणे गरजेच असल्याबाबत मला सांगता येणार नाही. आरोपीकडुन मी ब्रँच मॅनेजर रजेवर असताना कधी कामाचा तपशिल घेतला नाही. निघुट यांनी एफडी करण्यासाठी जी कागदपत्रे बँकेत दिली होती ती कागदपत्रे आजरोजी बँकेत असल्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की रंजना मोरे यांचे साडे तीन लाख रुपयांचे

व्हाउचर बँकमध्ये केवळ मी व ब्रँच मॅनेजर असे दोन अधिकारी असल्याने ते व्हाउचर मीच ऑथोराईज केले होते. हे म्हणणे खरे आहे की साडे तीन लाख रुपयांचे व्हाउचर ऑथोराईज करण्यासाठी कॅशीयर व दोन अधिकारी यांचे ऑथोराईजेशन लागेल. मी परत सांगते की एकच अधिका–याचे ऑथोराईजेशन लागेल.

प्रश्न– दि.१८.२.२०२१ रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी व तुमची पारनेर पोलीस स्टेशनच्या गेटबाहेर भेट झाली होती का?

उत्तर– हे मला आठवत नाही.

हे म्हणणे खरे नाही की दि.१८.२.२०२१ रोजी आरोपी त्याच्या बी.सी. पदाचा राजीनामा दिल्यानंतर बँक स्टाफने त्याच्या सहीचा गैरवापर केला व त्याचे नाव वापरुन अपहार केला यासंदर्भात आरोपी बँक स्टाफ व माझ्याविरुध्द पारनेर पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आला होता परंतु आम्ही त्याला फिर्याद देवु दिली नाही. हे मला सांगता येणार नाही की आरोपी त्याच्या लॅपटॉपवरुन व त्याच्या सी.एस.सी. आयडीवरुनच काम करायचा. सी.एस.सी. आयडीवरुन आरोपी अपहार करायचा का हे मला सांगता येणार नाही. आरोपीस सी.एस.सी. आयडीवरुन एफडी करुन देण्याचा अधिकार आहे का हे मला सांगता येणार नाही. सी.बी.एस. सॉफटवेअरची ट्रेनींग बी.सी. यांना देतात का याबाबत मला सांगता येणार नाही. ज्या ग्राहकांचे पैसे अपहारात बुडाले होते त्या ग्राहकांना त्यांचे पैसे परत मिळाले. हे म्हणणे खरे नाही की ग्राहकांना त्यांचे पैसे परत मिळाल्याने माझी आरोपीविरुध्द काही तक्रार राहीलेली नाही. हे मला सांगता येणार नाही की बँक स्टाफचे व बी.सी.चे आयडीकार्ड वेगवेगळे आहेत.

प्रश्न– रु.९,२२,०००/– ची रक्कम आरोपी बँक स्टाफला माहीत न होता खातेदाराच्या अनुपस्थीत विथड्रॉ करु शकतो का?

उत्तर– विथड्रॉ करु शकत नाही.

रु.९,२२,०००/– विथड्रॉवलसाठी किती अधिका–यांचे ऑथोरायझेशन लागते हे सांगता येणार नाही. रु.९,२२,०००/– चे विथड्रॉवल हेड ऑफीसला कळवावे लागत नाही.

प्रश्न– सन २०१९ साली एखाद्या ग्राहकाची विथड्रॉवल स्लीप एखाद्या ति–हाईत व्यक्तीने भरुन घेतली व ग्राहकाची सही घेवुन सन २०२१ साली विथड्रॉवल केली

तर असा व्यवहार लाल रंगाच्या स्लीपने होवु शकतो का?

उत्तर– नाही.

ठेव पावत्यांच्या नुतनीकरणासाठी विथड्रॉवल स्लीपची गरज लागत नाही. ठेवपावती धारक समोर हजर नसताना त्याची ठेव पावती विथड्रॉवल केली जावु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की ठेव पावती जर बंद करायची असेल तर ती ठेव पावती बँकेत जमा करावी लागते. मी ॲग्रीकल्चरल ऑफीसर असताना बंद झालेल्या ठेव पावत्यांचे रेकॉर्ड हे आता बँकेकडे असु शकते. हे म्हणणे खरे नाही की दि.१०.८.२०२० रोजी नवनाथ दिघे बँकेत हजर नसताना व त्यांची व्हाउचरवर सही नसताना रु.४,१०,०००/– च्या व्हाउचरवर भुषण संखे यांची ब्रँच मॅनेजर म्हणुन व माझी ऑथोराईजेशन म्हणुन सही आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासात मी आरोपीविरुध्द सांगितलेल्या बाबी खोटया आहेत. हे म्हणणे खरे नाही की बोरुडे यांच्यासोबत मी आरोपी क्र.२ असुन केवळ आरोपीस गुंतवण्यासाठी मी बँक स्टाफसोबत खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.10.14 12:27:14 +0530

(डॉ. एन.एस.सबनीस)

दिनांकः १३/१०/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,
पारनेर.